**<u>विशेष दि. दावा. नं. १६१/१९९५</u>**

**सिताबाई देशमुख** ...**वादी.**

**वि.**

**जयवंत देशमुख वगैरे** ...**प्रतिवादी.**

**<u>: आदेश निशाणी १५१ वर :</u>**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ रमेश बाळकृष्ण देशमुख हा मयत झाल्यामुळे प्रस्तावित प्रतिवादी हे त्याचे वारस असल्यामुळे त्यांना अभिलेखावर घेणेकरीता व तशी दुरुस्ती वादपत्रात करण्याकरिता दाखल केला आहे.

२. अर्जात असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.३ रमेश बाळकृष्ण देशमुख हा दिनांक ०६/११/२०१४ रोजी मरण पावलेला आहे आणि प्रस्तावित रोहिणी रमेश देशमुख, निकेत रमेश देशमुख, संकेत रमेश देशमुख, कल्याण रमेश देशमुख व प्रतिवादी क्र. ७ सुमित्रा बाळकृष्ण देशमुख यांचे शिवाय त्यांचे कायदेशीर वारस इतर कुणीही नाही. सबब, मयत प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर घेणेकरीता व तशी दुरुस्ती वाद पत्रात करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी अर्जाचे पाठीमागे लेखी उत्तर दाखल केले व योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली.

४. अर्जातील तथ्य कथन तसेच प्रतिकथन याचे अवलोकन न्यायालयाने केले. प्रस्तुत प्रकरणात रमेश बाळकृष्ण देशमुख हा मयत झालेला आहे हे तथ्य नाकारण्यात आलेले नाही. सबब, रमेश बाळकृष्ण देशमुख हा मयत झाल्यामुळे प्रस्तुत दावा पुढे चालू ठेवण्याकरीता त्याचे वारस

अभिलेखावर येणे आवश्यक आहे. तसेच त्या संबंधीची दुरुस्तीची विनंती हि किरकोळ स्वरुपाची आहे व प्रति पक्षास कोणत्याही प्रकारे हानी करणार नाही. म्हणुन प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**: आदेश :**

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. ३ रमेश बाळकृष्ण देशमुख याचे वारस रोहिणी रमेश देशमुख, निकेत रमेश देशमुख, संकेत रमेश देशमुख, कल्याण रमेश देशमुख यांना अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते व वादपत्रात त्यासंबंधी दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. प्रस्तावित दुरूस्ती वादीने सदर आदेशापासुन १४ दिवसांचे आत करण्याची आहे.

पनवेल. ( राजेश के. खोमणे)
दिनांक २८/०९/२०१५. २रे सहदिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.